जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८३ दिनांक - ३१/०१/२०२४**

येरवडा पोलीस स्टेशन,पुणे शहर

**प्रथमेश ऊर्फ गोट्या राजेंद्र सुर्यवंशी (टोळी प्रमुख) व त्याचा ०१ साथीदार यांचेविरुध्द मकोका अंतर्गत कारवाई**

दि.२९/१२/२०२३ रोजी नमुद आरोपी १) प्रथमेश ऊर्फ गोट्या राजेंद्र सुर्यवंशी वय २४ वर्षे रा.पर्णकुटी पायथा,येरवडा,पुणे २) आकाश तायप्पा कानडे वय २५ वर्षे रा.शनिआळी, येरवडा,पुणे यांनी पुर्वीचे वादाचे कारणांतुन आपसांत संगनमत करुन,हातामध्ये लोखंडी हत्यारे घेवुन येवुन परिसरात दहशत करुन फिर्यादी यांना जिवे ठार मारण्याचे उद्देशाने फिर्यादी यांचे डोक्यात व मानेवर वार करुन डाव्या हाताला मनगटाजवळ चावा घेवुन परिसरात दहशत करुन तु बचके रहना अशी धमकी दिली त्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादी वरून येरवडा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.८६२/२०२३ भा.दं.वि.सं कलम ३०७,३२५,३२३,५०६, ३४ आर्म ॲक्ट कलम ४/२५ म.पो.अधिनियम कलम ३७ (१) १३५ फौजदारी सुधारणा कायदा कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

दाखल गुन्ह्याच्या तपासा दरम्यान यातील आरोपी १) प्रथमेश ऊर्फ गोट्या बाळासाहेब सुर्यवंशी वय २४ वर्षे रा.पर्णकुटी पायथा,येरवडा, पुणे (**टोळी प्रमुख**) २)आकाश तायप्पा कानडे वय २७ वर्षे, रा.शनि आळी, येरवडा, पुणे (**टोळी सदस्य**) यांना दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

सदर टोळी प्रमुख प्रथमेश ऊर्फ गोट्या राजेंद्र सुर्यवंशी याने वेगवेगळ्या साथीदारांचे मदतीने परिसरात खुनाचे प्रयत्न करणे, प्राणघातक हत्यारानिशी दंगल माजवणे,गंभीर दुखापती करणे,तडीपार असतानाही प्रतिबंधीत क्षेत्रात प्रवेश करुन टोळीच्या मदतीने जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे,बेकायदेशीर प्राणघातक हत्यारे सतत जवळ बाळगुन परिसरात दहशत माजवणे तसेच जिवे ठार मारण्याच्या धमक्या देणे असे गंभीर गुन्हे केलेले आहेत.त्याने येरवडा परीसरात दहशत निर्माण करून,स्वतःसाठी व इतरांसाठी आर्थिक फायदा मिळविण्याचे उद्देशाने तसेच परिसरात त्याचे टोळीचे वर्चस्व वाढवण्यासाठी हिंसाचाराचा वापर करुन, नागरीकांच्या मनात भिती व दहशत निर्माण करुन गंभीर गुन्हे केलेले आहेत.

यातील आरोपी यांनी संघटीतपणे, दहशतीचे मार्गाने, बेकायदेशिरपणे स्वतःचे व टोळीचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी सदरचा गुन्हा केल्याचे स्पष्टपणे दिसुन आल्याने, तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रस्तुत गुन्ह्यास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणे अंतर्भाव करण्यासाठी येरवडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. बाळकृष्ण कदम यांनी मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४ श्री.विजयकुमार मगर यांचे मार्फतीने अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर श्री.रंजन कुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं.८६२/२०२३ भा.दं.वि.कलम ३०७,३२५,३२३,५०६,३४ आर्म ॲक्ट कलम ४/२५ म.पो.अधिनियम कलम ३७(१)१३५ फौजदारी सुधारणा कायदा कलम ३ व ७ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणेचा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर, श्री. रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहा.पोलीस आयुक्त, येरवडा विभाग, पुणे श्री. संजय पाटील हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री. रितेश कुमार,मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर,(अतिरिक्त कार्यभार) व मा.अपर पोलीस आयुक्त,(गुन्हे)पुणे श्री.रामनाथ पोकळे, मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे श्री. रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४ श्री. विजयकुमार मगर, मा.सहा. पोलीस आयुक्त श्री.संजय पाटील,यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशनचे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.बाळकृष्ण कदम, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.जयदिप गायकवाड, निगराणी पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक महेश लामखडे, पोलीस अंमलदार सचिन माळी,सचिन शिंदे,देविदास वांढरे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्त,पुणे शहर आयुक्त म्हणुन कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्राणांवर बारकाईने लक्ष देवुन शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व नागरीकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगारांच्या टोळींच्या हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन, संघटीत गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अमंलदार यांना सक्त निर्देश दिलेले आहेत. **त्यानुसार त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही ११५ वी कारवाई आहे.**